# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO


---

**गुरूवार, दिनांक १८ जुलै, २०१९**

**परिपत्रक क्र. ०१/२०१९**

क्रमांक : ०१/२०१९ दि. १८.७.२०१९

**विषय : परीक्षा विभागाशी संबंधित डाक स्विकारण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्मितीबाबत.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सामान्य प्रशासन विभागातील केंद्रीय आवक शाखेद्वारे विद्यापीठाच्या विविध विभागांशी संबंधित डाक स्विकारण्यात येऊन वर्गवारीनिहाय नोंदणी केल्यानंतर संबंधित विभागांकडे उचित कार्यवाहीसाठी हस्तांतरीत केली जाते.

केंद्रीय आवक शाखेमध्ये येणाऱ्या डाकेमध्ये परीक्षा विभागाशी संबंधित परीक्षा फॉर्म्स, डेझरटेशन, पीएच.डी. शी संबंधित समरीज, थेसिस इ. डाक मोठ्या प्रमाणावर आवक होते. सदर डाकेला काल मर्यादेचे बंधन असल्यामुळे त्यावर कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करून वेळेच्या आत हस्तांतरीत करतांना अत्यल्प मनुष्यबळामुळे अनेक अडचणी येत आहेत. सदर डाक वजनीही असल्याने विद्यापीठ वाहनाच्या उपलब्धतेनुसार पाठविल्या जाते. परीणामी कधी कधी डाक वाटपात विलंब होतो.

वरील परीस्थितीवर तोडगा काढण्याचा अनेक वेळा प्रयत्न करण्यात आला. दिवसेंदिवस वाढणारी विद्यार्थी संख्या, सत्र परीक्षा पद्धती, महाविद्यालयांची वाढती संख्या, विद्यापीठ कर्मचारी सेवानिवृत्तीचे वाढलेले प्रमाण इत्यादीचा विचार करून विद्यापीठ अध्यादेश क्र. २१/२००१ मधील पार्ट-बी (१) चे अधिन राहून परीक्षा फॉर्म्सह इतरही परीक्षा विभागाशी संबंधित डाक ही सरळ परीक्षा विभागातच स्विकारण्याची व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यानुषंगाने सर्व प्राचार्यांना तसेच संबंधितांना सूचित करण्यात येते की, केंद्रीय आवक शाखेद्वारे स्विकारण्यात येणारी परीक्षा विभागाशी संबंधित सर्व डाक केंद्रीय आवक शाखेमध्ये स्विकारणे बंद करण्यात येत असून यापुढे दि. १ ऑगस्ट, २०१९ पासून अध्यादेश क्र. २१/२००१ मधील पार्ट-बी(१) च्या अधिन राहून नियमित/माजी/बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संबंधित महाविद्यालयामार्फतच परीक्षा विभागाच्या आवक शाखेमध्ये जमा करावेत. तसेच पीएच.डी. शी निगडीत डाक, डेझरटेशन्स, इत्यादी देखील परीक्षा विभागाच्या आवक शाखेमध्येच स्विकारल्या जातील.

स्वा./-<br>
कुलसचिव<br>
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## अधिसूचना

क्रमांक : ७१/२०१९ दिनांक : १८-७-२०१९

**विषय :- महाविद्यालय बंद करण्याबाबत...**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सुचित करण्यात येते की, भोसला कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च, अकोला (२६८) हे महाविद्यालय बंद करण्यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम १२० नुसार संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असुन या बाबत विद्या परीषदेच्या दि.३०.४.२०१९ रोजीच्या सभेत विषय क्र.१२ अन्वये या महाविद्यालयाचे संलग्निकरण काढुन टाकण्याची अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विद्या परिषदेने मान्य केलेली आहे.

त्यानुसार खालील तक्त्यामध्ये दर्शविलेले महाविद्यालय शैक्षणिक सत्र २०१८-१९ पासून ए. आय. सी. टी. ई. च्या अधिन राहुन टप्या-टप्यांने बंद करण्यात येत आहे.

आदेशान्वये.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व सांकेतिक क्रमांक | महाविद्यालयातील अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | भोसला एज्युकेशन, ट्रस्ट नागपुर. | भोसला कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च,अकोला(२६८) | बी.ई.<br>१.मेकॅनिकल इंजिनिअरिंग.<br>२. सिव्हील इंजिनिअरिंग.<br>३. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिग.<br>४. इलेक्ट्रानिक्स इंजिनिअरिग.<br>५. इलेक्ट्रानिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन.<br>६. कॉम्प्युटर इंजिनिअरिग. |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## NOTIFICATION

No. 72 /2019 Date :18.07.2019

**Subject – Change of Name of University Students.**

The applications for change of names of the following students mentioned in column No. 2 have been found in order as provided in para 2( i ) of the Ordinance No.109 vide provisions given in column no.3 in respect of recording the change of names in the University records.

It is notified that , in accordance with the provisions of para 4 of the said Ordinance hereby grant the change of names of the students as stated in column No. 4 below.

| Sr. No. | Old Name | Provision In Ordinance No.109 | Changed Name. |
|---|---|---|---|
| 1 | Ku. Khushbu Shivram Kherwasiya | 2(i)a | Sau. Khushbu Yashwant Mehta |
| 2 | Afsana Akhtar Ansari Naz | 2(i)a | Afsana Iqbql Hussain |
| 3 | Ku. Rajkanya Dattatraya Belkhede | 2(i)a | Sau. Rajkanya Dinkar Adole |
| 4 | Ku. Anupama Jugalkishore Tapdia | 2(i)a | Sau. Anupama Madhur Laddha |
| 5 | Ku. Deepti Damodar Warhade | 2(i)a | Sau. Deepti Sandeep Narkhede |
| 6 | Ku . Ashwini Sanjay Deshmukh | 2(i)a | Sau. Ashwini Yogesh Deshmukh |
| 7 | Ku. Kalyani Ganesh Tayade | 2(i)a | Sau. Kalyani Vivek Waghmare |
| 8 | Ku. Mohana Vasantrao Nalge | 2(i)a | Sau. Mohana Ravindra Dorge |
| 9 | Lalit Vilasrao Pawar | 2(i)f | LKV Pawar |

Sd/-
(Dr.H.R.Deshmukh)
Director,
Board of Exams and evaluation
Sant Gadge Baba Amravati University,
Amravati